# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०२/०१/२०२५ अनु.क्र. ०२

## (अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/आंजिब हजर पो.अ.छत्रपती संभाजीनगर/११००३/२०२४ अमरावती शहर दिनांक १९/१२/२०२४**

**संदर्भ :-** (१) या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/आंजिब-स्विकृती/८७१३/२०२४, दि.०३.१०.२०२४

(२) पोलीस अधिक्षक,लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश पोअलो छ.सं/प्रलि-आस्था/आंतर जिल्हा बदली /२०२४,३५१७ दि.१३/१२/२०२४

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे संदर्भीय क्र. १ अन्वये आंतरजिल्हा बदली अंतर्गत विनंती वरुन पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे स्विकृती देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पोलीस अधिक्षक,लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना बदलीवर हजर होण्यास दिनांक १५/१२/२०२४ चे मा.नंतर कार्यमुक्त केले आहे. पोलीस स्टेशन भुसावळ यांचा कार्यमुक्त पत्र दि.१६/१२/२०२४ मा.नंतर सदर पोलीस शिपाई बदलीवर हजर होण्यास आल्याने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पोलीस शिपाई पदावर या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येत असुन त्यांची नेमणुक त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदाराचे पदनाम/ ब.क्र. व संपुर्ण नाव | मुळ घटक | कार्यमुक्त केल्याचा दिनांक | या घटकात हजर झाल्याचा दिनांक | स्विकृतीचे पद व प्रवर्ग | देण्यात आलेला नविन ब.क्र. | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोना/२१६ अतुल ज्ञानेश्वर कराळे | पोलीस अधिक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर | १६/१२/२०४ मा.नंतर | १७/१२/२०२४ मा.नंतर | पोलीस शिपाई खुला | ९९९ | पोलीस मुख्यालय अमरावती शहर |

वर नमुद पोलीस अंमलदार हे आंतरजिल्हा बदली अंतर्गत बदलुन आल्याने त्यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. संकिर्ण १०१७/३८४३/प्र.क्र. ४६९/पोल-५ दिनांक २६.१०.२०१७ मधील तरतुदीनुसार वरील पोलीस शिपाई यांची सेवा जेष्ठता त्याच्या भरती वर्षात अमरावती शहर आस्थापनेवर सेवाजेष्ठतेने सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित करण्यात येईल.

वर नमुद पोलीस शिपाई यांनी प्रथम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आमद देवुन तेथे शासकिय संरजाम घ्यावा व नंतर नेमणुकीच्या ठिकाणी हजर व्हावेत.

## भाग-२

## <u>शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण</u>

## <u>शिक्षा</u>

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोहवा-१७६७ हकीम/१०८१९/२०२४ अमरावती शहर दिनांक ०९/१२/२०२४**

### आदेश

**संदर्भ क्रमांक** :-१) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/ परि-२/कसुरी/पोहवा-१७६७ अब्दुल हकीम४/१७७/२०२४, दिनांक १७/०२/२०२४

२) सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ४१७/२०२४, दिनांक ०३/०२/२०२४

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २३६/२०२४, दिनांक ०१/०२/२०२४

४) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ का.दा.नो./ पोहवा-१७६७ हकीम/२५८४/२०२४, दिनांक ०७/०३/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोहवा/१७६७ अब्दुल हकीम, नेमणुकपोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोहवा/१७६७ अब्दुल हकीम, पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे दिनांक ०६/०९/२०२३ रोजी सकाळी ०८.०० पासुन ते दिनांक ०७/०९/२०२३ चे सकाळी ०८.०० वा. पावेतो हवालात गार्ड डयुटी लावण्यात आली होती. तुमचे गार्ड इंचार्ज पोहवा/९६० मनोज सुने, नेमणुक पो.स्टे.सिटी कोतवाली हे होते व तुमचे सोबत गार्ड मध्ये (१) सपोउपनि/१२४६ संजय अधापुरे, नेमणुक पो.स्टे.गाडगे नगर, (२) पोशि/४६७ प्रमोद खोपे, नेमणुक पो.स्टे.वलगांव व (३) पोशि/१८३४ हरिष भुजाडे, नेमणुक पो.स्टे.खोलापुरी गेट असे संपुर्ण गार्ड कर्तव्यावर हजर होती. तुमचा सकाळी १०.०० वा. पासुन १२.०० वा. दरम्यान संत्री पहारा डयुटीवर हजर असतांना पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर येथील अप क्र. ४५१/२०२३ कलम ३७९ भादवि गुन्हयांतील आरोपी नामे शेख अय्युब वल्द शेख चांद, वय ५४ वर्ष रा.नालसापुरा, अमरावती यास त्यांचे नातेवाकीचा मोबाईल क्र. ९८५०६८८४५९ यावर तुम्ही तुमच्या स्वत:चे मोबाईल क्र. ९८९०२८५५२३ यावर हवालातचे गेटच्या बाहेरुन व्हाईस कॉलव्दारे आरोपीचे त्यांचे नातेवाईका सोबत बोलणे करुन दिले. याबाबत हवालात गार्ड चे इंचार्ज पोहवा/९६० मनोज सुने, नेमणुक पो.स्टे.सिटी कोतवाली यांनी स्टेशन डा. नोंद क्र.

०१८/२०२३ वेळ ११.४२ वा. सविस्तर नोंद घेतलेली आहे. तुम्ही हवालात गार्ड संत्री डयुटी संदर्भात वर्तणुक व डयुटीमध्ये केलेला हलगर्जीपणा व साक्षीदारांच्या बयाणा वरुन व स्टेशन डायरी मधील नोंदी वरुन स्पष्ट होते की, तुम्हाला पोलीस खात्याचे कर्तव्यविषयी कोणतीच जागरुता दिसुन येत नाही. तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर असतांना तुम्ही स्वत:चे मोबाईल वरुन आरोपीचे नातेवाईकांना बोलणे करुन दिले. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर न झाल्याने पुन्हा बिनतारी संदेश दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी समक्ष बोलावले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले नाही. तरी सुध्दा तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोशि-३८ अघम/१०८१८ /२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** **:-** १) उप-जिल्हा निवडणुक अधिकारी, अमरावती यांचे कडील जावक क्र. कक्ष-१४/ सा.नि./अ.का./कावि-२८४/२०२४, दिनांक ३०/१०/२०२४

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/निवडणुक नि.(खर्च) गार्ड गैरहजर/क.अह./का.दा.नो./पोशि-३८ अघम/६५४७/२०२४, दि३०/१०/२०२४

**कसुरदारचे नाव** **:-** पोशि/३८ दिनेश अघम, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोशि/३८ दिनेश अघम, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमचे मा.श्रीमती उमा माहेश्वरी, निवडणुक निरीक्षक (खर्च) यांचे सुरक्षा गार्ड कर्तव्य नेमले असतांना दिनांक २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वा. निवडणुक निरीक्षक यांनी तुम्हाला सुटी वर सोडले असता तुम्ही सुटी संपताच दिनांक ३०/१०/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. मा. निवडणुक निरीक्षक (खर्च) यांचे सुरक्षेकरीता उपस्थित राहणे आवश्यक असतांना तुम्ही दुपारी १२.१५ वा. विलंबाने उपस्थित झाल्यामुळे मा. निवडणुक निरीक्षक यांना नियोजित दौरा करता आला नाही. त्यामुळे त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. निवडणुक कालावधी दरम्यान कर्तव्यात हयगय केली असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय पोलीस खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता सुटीवरुन विलंबाने कर्तव्यावर हजर झाले आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. २०००/- (अक्षरी - दोन हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये** ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले नसल्याने पुन्हा संधीचे पत्र क्रमांक ९६२७/२०२४, दिनांक ०५/११/२०२४ अन्वये संधी देण्यात आली असुन संधीचे पत्र सुध्दा तुम्हाला तामील झालेल आहे, तरी तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक ०५/१२/२०२४ अन्वये दिनांक ०६/१२/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले नाही. तरी तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>अंतिम आदेश</u>

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- (अक्षरी - पाचशे रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतीत सादर करु शकता.

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोना-७१५ वाकपांजर/१०८२३/२०२४**
**अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :-१) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक

क्रमांक ३०३६/२०२३, दिनांक १७/११/२०२३

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ गैरहजर/का.दा.नो./पोना-७१५ वाकपांजर/१५२६०/२०२३, दिनांक १५/१२/२०२३

**कसुरदारचे नाव :-** पोना/७१५ संदिप वाकपांजर, नेमणुकपोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोना/७१५ संदिप वाकपांजर, तत्का.नेमणुकपोलीस मुख्यालय (सध्या पोलीस स्टेशन वलगांव),अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-१/सार्वत्रिक बदली/६२६१/२०२३ अमरावती, दिनांक ३०/०५/२०२३ अन्वये पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे बदली झाली असल्याने तुम्हाला पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथुन स्टे.डा.साना क्र. २१/२३, दिनांक १४/०६/२०२३ रोजी चे ११.३० वा. बदलीच्या ठिकाणी म्हणजे पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे बदली वर रवाना करण्यात आलेले आहे. परंतु तुम्हाला बदली वर रवाना केल्यानंतर बदली पास घेवुन संबंधित पोलीस स्टेशन वलगांव येथे कर्तव्यावर हजर होणे अपेक्षित असतांना सुध्दा तुम्ही बदली पास घेवुन गेले नाही. तरी तुम्हाला पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथुन बदली पास घेवुन जाणे करीता वारंवार माहिती देवुन सुध्दा पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे हजर न झाल्याने तुमची बदली पास पोलीस स्टेशन वलंगाव, अमरावती शहर येथे पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथील जावक क्रमांक १७२७/२०२३, दिनांक १९/०६/२०२३ रोजी नोटीस तामील करणारे पोशि/१६८९ अजय इंगळे यांचे मार्फती ने लेखी पत्रासह सादर करण्यात आलेली होती. परंतु तुम्ही पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे आजपावेतो गैरहजर मधुन हजर न झाल्याबाबत पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथील जावक क्रमांक २४४२/२०२३, दिनांक १४/११/२०२३ अन्वये पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे पत्र देण्यात आले आहे. तुम्ही पोलीस स्टेशन वलगांव येथे आजपावेतो गैरहजर मधुन हजर झाले नाही याबाबत पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे कळविलेले आहे.

परंतु तुम्हाला पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे तुमची बदली झाल्याने बदलीच्या ठिकाणी पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथुन दिनांक १४/०६/२०२३ रोजी रवाना करण्यात आले असुन तुम्ही आज पावेतो तुमच्या नेमणुकीच्या ठिकाणी पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे हजर झाले नसुन तुम्ही दिनांक १४/०६/२०२३ पासुन ते आजपावेतो गैरहजर असुन गैरहजर बाबत वरिष्ठांना कोणतीही सुचना न देता परस्पंर गैरहजर असुन तुम्ही तुमचे कर्तव्य टाळण्याच्या दृष्टीने जाणीवपुर्वक अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले आहे. तुमच्या अश्या स्वरुपाचे वर्तणुकीवरुन व जाणीवपुर्वक व हेतुपुरस्परपणे कर्तव्य टाळण्याच्या उदेशाने गैरहजर राहिले असुन तुम्ही वरिष्ठाना कोणतीही माहिती दिली नाही, लेखी सुध्दा कळविले नाही. वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता. तुम्ही तुमचे मौखीक म्हणणे आमचे समक्ष मांडले असुन, तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेवून व सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५०००/- (अक्षरी - पाच हजार रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतीत सादर करु शकता.

# बक्षिस

**१.पोआअ/आस्था-८/ बक्षीस /०४/२०२५ अमरावती शहर दिनांक ०१/०१/२०२५**

## आदेश

शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या अधिन राहुन मी पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) अमरावती शहर, खालील नमुद पोलीस अधिकारी /अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे **उत्कृष्ट** कामगिरी बाबत बक्षिस मंजुर करीत आहे .

| अ. क्र. | पो.अधि. व अमंलदारांचे नाव | नेमणुक | विवरण | बक्षिस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बक्षीस | सी नोट |
| १ | पोहवा/१२४२ संजय देवुळकर | पो.स्टे.नांदगाव पेठ | सन २०२३-२०२४ चे मधील घेण्यात आलेल्या वार्षिक गोपनिय शेरे वेळी चांगले टर्नआऊट व गणवेष सुरळीतपरीधान केल्याबाबत. | २०० | जिएसटी |
| २ | पोहव/१००२ मोहन धोंडे | पो.स्टे.नांदगाव पेठ | | १०० | जिएसटी |
| ३ | पोहवा/१२४२ संजय देवुळकर | पो.स्टे.नांदगाव पेठ | | २०० | जिएसटी |
| **एकुण** | | | **पाचशे फक्त** | **५००/-** | **--** |

प्रमाणित करण्यांत येते की, शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ मुंबई पोलीस नियमावली १९५९ चा भाग - १ नियम ३०० मधील विहीत तरतुदीनुसार रोख रक्कम मंजुर करण्यांत आली आहे.सदरचा खर्च - २०५५०१६८-१०९-१- जिल्हा पोलीस - ५- बक्षिस- या लेखा शिर्षाखालील मंजुर अनुदानामधून भागविण्यांत यावे.

**२.पोआअ/आस्था-८/ बक्षीस /०३/२०२५ अमरावती शहर दिनांक ०१/०१/२०२५**

**आदेश**

शासन निर्णय गृह विभाग क्र.एडबल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या अधिन राहुन मी पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) अमरावती शहर, खालील नमुद पोलीस अधिकारी /अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे **उत्कृष्ट** कामगिरी बाबत बक्षिस मंजुर करीत आहे .

| अ.क्र. | पो.अधि. व अमंलदारांचे नाव | नेमणुक | विवरण | बक्षिस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बक्षीस | सी नोट |
| १ | पोहवा/११८१ प्रमोद सहारे | गाडगे नगर | सन २०२३-२०२४चे दि.२६/१२/२४ मधील घेण्यात आलेल्या वार्षिक गोपनिय शेरे वेळी चांगले टर्नआऊट व गणवेष सुरळीतपरीधान केल्या बाबत. | ५०० | जिएसटी |
| २ | श्रेपोउपनि/८८३ केशव मालवे | गाडगे नगर | | २०० | जिएसटी |
| ३ | श्रेपोउपनि/१२७१ विजय ढोके | गाडगे नगर | | ५०० | जिएसटी |
| ४ | पोहवा/११६० विनोदसिंग चव्हाण | गाडगे नगर | | ५०० | जिएसटी |
| ५ | पोहवा/१०५ भारत वानखडे | गाडगे नगर | | १०० | जिएसटी |
| **एकुण** | | | **अठराशे रुपये फक्त** | **१८००/-** | **--** |

प्रमाणित करण्यांत येते की, शासन निर्णय गृह विभाग क्र.एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ मुंबई पोलीस नियमावली १९५९ चा भाग - १ नियम ३०० मधील विहीत तरतुदीनुसार रोख रक्कम मंजुर करण्यांत आली आहे.सदरचा खर्च - २०५५०१६८-१०९-१- जिल्हा पोलीस - ५- बक्षिस- या लेखा शिर्षाखालील मंजुर अनुदानामधून भागविण्यांत यावे.

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**०१.पोआअ/प्रलि-आस्था/श्रेणी.पोउपनि/११२६८/२०२४ अमरावती दि. ३१.१२.२०२४**

**आदेश**

**संदर्भ** - १. शासन निर्णय, गृह विभाग शा.नि.क्र. पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल- ५ब,

दि.२५/०२/२०२२

२. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांचे पत्र क्र.पोमसं/६/पदोन्नती/ग्रेड पीएसआय/३४/२०२२, दि.२८.०३.२०२२ व दि.०७.०४.२०२२

३. या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-प्रलि श्रेणी पोउपनि/१०३८५/ २०२४दि.०३.१२.२०२४

**विषय** - श्रेणी पोलीस उप निरीक्षक( Grade PSI ) संबोधन नाकारलेल्या पोलीस अंमलदारा बाबत.

## आदेश

सपोउपनि/९७२ लता माणिकराव सोळंके नेमणुक पो.स्टे.राजापेठ हया शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक :- पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५,ब दिनांक २५/०२/२०२२ मधील परि.क्र.८ मध्ये नमुद तिनही निकष पुर्ण करीत असल्याने त्यांना श्रेणी पोलीस उप निरीक्षक( Grade PSI ) म्हणुन संबोधण्यात आले होते. तथापी सदर महीला पोलीस अंमलदार यांना श्रेणी पोलीस उप निरीक्षक( Grade PSI ) संबोधन स्वेच्छेने नाकारल्याने त्यांचे श्रेणी पोलीस उप निरीक्षक( Grade PSI ) संबोधण्याचे आदेश रद्द करण्यात येत आहे.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस